MHAH220013712022

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | ०१ | ०९ | २०२२ |
| नोंदणी तारीख | ०२ | ०९ | २०२२ |
| निकाल तारीख | १२ | ०८ | २०२६ |
| कालावधी | ०३ वर्षे | ११ महिना | ११ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालय, कर्जत.**

(आर. बी. राऊत, पिठासीन अधिकारी)

**नियमित फौजदारी खटला क्र.२२६/२०२२** **नि.क्र.22**

**गुन्हा रजिस्टर क्र. ५२०/२०२२, कर्जत पोलीस स्टेशन**

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | **महाराष्ट्र शासनतर्फे,**<br>प्रभारी अधिकारी,<br>कर्जत पोलीस स्टेशन, कर्जत, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |
| अभियोगपक्षातर्फे | | प्रभारी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर |
| **आरोपी** | १ | **सपना बबन साळवे**<br>वयः ४५ वर्षे, व्यवसायः घरकाम |
| | २ | **बबन सर्जेराव साळवे**<br>वयः ३५ वर्षे, व्यवसायः मजुरी<br>सर्व रा. सोनाळवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |
| आरोपींतर्फे | : | विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे |

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | १७/०७/२०२२ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | १७/०७/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | ०१/०९/२०२२ |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक<br>(Date of framing of Charge/Particular) | १३/०३/२०२६ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक<br>(Date of commencement of Evidence) | १३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक<br>(Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |

| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | १२/०८/२०२६ |
|---|---|
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentence imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सपना बबन साळवे | – | १३/०३/२०२६ | भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ | निर्दोष | लागू नाही | – |
| २ | बबन सर्जेराव साळवे | – | १३/०३/२०२६ | | निर्दोष | लागू नाही | – |

## न्यायनिर्णय

(दिनांक १२/०८/२०२६ रोजी पारित )

प्रस्तुत खटला आरोपी क्र. १ व २ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला व त्यामध्ये संपरिक्षा करण्यात आली.

२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, दि. १७/०७/२०२२ रोजी मौजे सोनळवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे दुपारी १५.०० वाजताच्या सुमारास फिर्यादीच्या घराच्या परिसरात दोन्ही आरोपींनी फिर्यादीच्या हातावर चाकूने वार करुन दुखापत पोहोचवली. फिर्यादीच्या मुलाला व सुनेला लाथाबुक्यांनी मारहाण केली व दुखावत पोहोचवली. आरोपींनी सामाईक हेतूच्या पूर्तीसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना अपशब्द बोलून गुन्हेगारी धाकदपाटशा दाखविला व अपमानित केले.

३. आरोपी क्र. १ व २ विरुध्द नि.क्र.९ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपी क्र. १ व २ यांनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन नि. १० व ११ अन्वये करुन खटला चालविण्याची विनंती

केली. आरोपी क्र. १ व २ विरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

४. अभियोगपक्षातर्फे प्रभारी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बाविस्कर आणि आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. यु. एस. नेवसे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणात दाखल कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता माझ्यासमक्ष खालील मुद्दे प्रकरणाच्या निर्णयासाठी विचारार्थ आहेत. सदर मुद्यावर कारणमीमांसेसह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दि.१७/०७/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजताच्या सुमारास मौजे सोनळवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे आरोपी क्र. १ व २ यांनी आपसात संगनमत करुन त्यांचे सामाईक हेतुचे पुर्ततेसाठी आरोपींनी फिर्यादीच्या हातावर चाकूने वार करुन इच्छापुर्वक शारिरीक दुखापत केली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२४ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला ? | नकारार्थी. |
| २. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद दिवशी, दुपारी १५.०० वाजताच्या सुमारास व वर नमुद ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन त्यांचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी लाथा व बूक्क्यांच्या सहाय्याने फिर्यादीच्या मुलाला आणि सुनेला इच्छापुर्वक शारीरिक दुखापत केली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन त्यांचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांना अपशब्द बोलून गुन्हेगारी धाकदापअशा दाखवला जाणीवपुर्वक शिवीगाळ करुन अपमानित केले जेणेकरुन त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल अथवा अपराध घडेल असे जाणीपूर्वक कृत्य करुन भारतीय दंड विधान कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला ? | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद दिवशी, वेळी व | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | ठिकाणी आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी संगनमत करुन त्यांचे सामाईक हेतूचे पूर्ततेसाठी फिर्यादी व साक्षीदार यांच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन गुन्हेगारी धाकदापटशा दाखवला व त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला ? | |
| ५. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

६. अभियोगपक्षाने आरोपी क्र. १ व २ विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र. १ भाऊसाहेब दादासाहेब साळवे यांची साक्ष नि.क्र. १५ वर नोंदविण्यात आली आहे.साक्षीदार क्र. २ अर्चना भाऊसाहेब साळवे हिची साक्ष नि. क्र. १६ वर नोंदविण्यात आली. साक्षीदार क्र. ३ नंदाबाई दादासाहेब साळवे यांची साक्ष नि. क्र. १७ वर नोंदविण्यात आली.

### मुद्दे क्र.१ ते ४ करिता

७. वरील सर्व मुद्दे एकाच घटनेशी संलग्न असल्यामुळे मी त्यांना एकत्रीतपणे चर्चेसाठी घेत आहे.

८. साक्षीदार क्र.१ भाऊसाहेब दादा साळवे यांनी त्यांच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, ते आरोपींना ओळखतात व आरोपींनी त्यांना व त्यांच्या पत्नीला सांडपाणी का अडवले म्हणून फावडयाने व चाकुने मारहाण केली नाही. सदर साक्षीदाराने आरोपींनी त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली हे नाकारले आहे. साक्षीदार क्र. २ अर्चना भाऊसाहेब साळवे हिने तिच्या सरतपासणीमध्ये असे कथन केले आहे की १७/०७/२०२३ रोजी कोणतीही घटना घडली नाही. तिला आरोपींनी सांडपाणी का अडवले म्हणून फावडयाने व चाकूने मारहाण केली नाही. साक्षीदार क्र. ३ नंदाबाई दादासाहेब साळवे हिने तिच्या सरतपासणीमध्ये असे कथन केले आहे की १७/०७/२०२३ रोजी कोणतीही घटना घडली नाही. तिला आरोपींनी सांडपाणी का अडवले म्हणून फावडयाने व चाकूने मारहाण केली नाही.

९. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदाराने अभियोग पक्षाला मदत होईल अशी

कोणतीही साक्ष दिली नाही. साक्ष्जीदारांनी त्यांच्या पुराव्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड (नि. १३ ) अन्वये झाली आहे हे मान्य केले आहे. अभियोग पक्षाने आरोपीवरील आरोप सबळ पुराव्यानिशी सिद्ध केले नाहीत. नि. १९ खाली पुरसीस दाखल करुन खटला फिर्यादीला चालवायचा नाही असे देखील फिर्यादीने कथन केले आहे. त्यामुळे आरोपीच्या विरुद्ध पुरेसा पुरावा नसल्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ ते ४ चा निष्कर्ष वरील प्रमाणे नोंदवलेला आहे. करिता मुद्दा क्र. ५ प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ सपना बबन साळवे, आरोपी क्र. २ बबन सर्जेराव साळवे सर्व रा. सोनाळवाडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. १ व २ चे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. संबंधित पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी गुन्हयात जप्त केलेला ९.५ सेमी लांबीचा फिक्कट लाल रंगाच्या लांबीची मुठ असलेला चाकु हा न्यायालयात दाखल केलेला नाही, म्हणून त्याची नियमाप्रमाणे संबंधित पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी विल्हेवाट लावावी.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपी क्र. १ व २ यांनी प्रत्येकी १५,०००/– रू. चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचा जामीन मुचलका द्यावा.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.08.12 18:15:07 +0530

दिनांकः १२/०८/२०२६ (आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.

(न्यायालय क्र.२)

## सूची–I

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.१५ | भाऊसाहेब दादा साळवे | साक्षीदार |
| अ.सा.क्र. २ – नि. क्र. १६ | अर्चना भाऊसाहेब साळवे | साक्षीदार |
| अ.सा.क्र. ३– नि. क्र. १७ | नंदा दादासाहेब साळवे | साक्षीदार |

**ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

**अ. अभियोगपक्षः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १७ | फिर्यादवरील सही |
| २ | १९ | पुरावा देणे नाही पुरसिस |

**ब. आरोपीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | | – |

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.08.12 18:14:50 +0530

दिनांकः १२/०८/२०२६.

(आर. बी. राऊत)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.
(न्यायालय क्र.२)

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, या पी.डी.एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | आर. बी. राऊत, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र. २) कर्जत, जि.अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नाव | : | भाग्यश्री बी. बांगर, लघुलेखक (श्रेणी–३). |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १२.०८.२०२६ |